पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★
महात्मा बसवेश्वर अध्यासन

# महात्मा बसवेश्वरांच्या कार्यावर अभ्यासक्रम

## कुलगुरु डॉ. महानवर; सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासनाची बैठक

सोलापूर : पुढारी वृत्तसेवा

महात्मा बसवेश्वर यांचे मानवतावादी कार्य समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्यावतीने महात्मा बसवेश्वरांचे जीवन आणि कार्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणार असल्याचे कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन सल्लागार समितीची बैठक विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरु डॉ. महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला प्र-कुलगुरु प्रा.डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर आदी उपस्थित होते. यावेळी बैठकीत महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्यावतीने अल्पकालावधीचे विविध अभ्यासक्रम तयार करणे आणि हे अभ्यासक्रम सर्व इच्छुकांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन आणि विचारांवर आधारित असलेली ग्रंथसंपदा संकलित करून कायमस्वरूपी जतन करण्याचे निश्चित केले. ग्रंथाचा मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महात्मा बसवेश्वर विश्वसंवाद सदन आणि महात्मा बसवेश्वर आयुर्वेदिक उद्यान निर्माण करण्यासाठी प्र-कुलगुरु डॉ. दामा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक हेमंत हरहरे यांनी सर्व उपक्रमाचे कौतुक केले. बैठकीला महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे सदस्य प्राचार्य गजानन धरणे, महादेव न्हावकर, स्वाती महाळंक, सुरेश शहापूरकर, राहुल पावले आदी उपस्थित होते.




सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन सल्लागार समितीची बैठक कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीसाठी उपस्थित असलेल्यांचा सत्कार करताना डॉ. महानवर. यावेळी उपस्थित मान्यवर.

### सामंजस्य करार करणार

महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर आधारित व्याख्याने, चर्चा, कार्यशाळांचे आयोजन करणे, तसेच अध्यासन केंद्राच्या वतीने श्री सिद्धेश्वर देवस्थान, महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील विविध संस्था महाविद्यालयासोबत सामंजस्य करार करण्यात येईल, असे डॉ. कोळेकर यांनी सांगितले.

पुढारी 07/07/2024

संचालक
महात्मा बसवेश्वर अध्यासन
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर लवकरच अभ्यासक्रम सुरू करणार

## कुलगुरू डॉ. महानवर : सोलापूर विद्यापीठात बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क




महात्मा बसवेश्वर अध्यासन सल्लागार समितीच्या बैठकी प्रसंगी कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ.महादेव खराडे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.वसंत कोरे, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ.प्रभाकर कोळेकर.

**सोलापूर :** महात्मा बसवेश्वर यांचे मानवतावादी कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्यावर आधारीत अभ्यासक्रम सुरू करणार असल्याचे कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांनी शुक्रवारी सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन सल्लागार समितीची बैठक विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ मॉंसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला प्र-कुलगुरू प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ.महादेव खराडे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.वसंत कोरे, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ.प्रभाकर कोळेकर उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक हेमंत हरहरे, प्राचार्य गजानन धरणे, महादेव न्हावकर, स्वाती महाळंक, सुरेश शहापूरकर, राहुल पावले आदी उपस्थित होते.

### बसवेश्वरांचे ग्रंथ अनुवाद करण्याचा निर्णय

यावेळी बैठकीत महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्या वतीने अल्पकालावधीचे विविध अभ्यासक्रम तयार करणे आणि हे अभ्यासक्रम सर्व इच्छुकांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. ग्रंथाचे मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचा निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर विश्वसंवाद सदन आणि महात्मा बसवेश्वर आयुर्वेदिक उद्यान निर्माण करण्यासाठी प्र-कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. अध्यासन केंद्राच्या वतीने श्री सिद्धेश्वर देवस्थान आणि महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील विविध संस्था महाविद्यालयासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी दिली.

लोकमत
दि:- ०७/०५/२१

# विद्यापीठ बसवेश्वरांच्या कार्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणार

## कुलगुरू डॉ. महानवर यांची माहिती, अध्यासन समितीची बैठक

प्रतिनिधी | सोलापूर

महात्मा बसवेश्वर यांचे मानवतावादी कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणार असल्याचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन सल्लागार समितीची बैठक विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ मॉंसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते.

महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्या वतीने अल्प कालावधीचे विविध अभ्यासक्रम तयार करणे आणि इच्छुकांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित ग्रंथ संपदा जतन करण्याचे निश्चित करण्यात आले. ग्रंथाचे मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचा निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर विश्वसंवाद सदन आणि महात्मा बसवेश्वर आयुर्वेदिक उद्यान निर्माण करण्यासाठी प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

दिव्य मराठी
दि:- ०७/०५/२१

महात्मा बसवेश्वर अध्यासन

संचालक
महात्मा बसवेश्वर अध्यासन
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर अभ्यासक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्यावतीने महात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी दिली.

विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या सल्लागार समितीची बैठक कुलगुरू डॉ. महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्यावतीने अल्प कालावधीचे विविध अभ्यासक्रम तयार करणे आणि हे अभ्यासक्रम सर्व इच्छुकांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. महात्मा बसवेश्वरांच्या जीवन आणि वैचारिक मूल्यांवर आधारित असलेली ग्रंथसंपदा संकलित करून कायमस्वरूपी जतन करून ठेवण्याचेही निश्चित करण्यात आले. ग्रंथांचे मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला. महात्मा बसवेश्वर विश्व संवाद सदन आणि महात्मा बसवेश्वर आयुर्वेदिक उद्यान उभारण्यासाठी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचे ठरले.

महात्मा बसवेश्वरांच्या जीवन कार्यावर आधारित व्याख्याने, चर्चासत्र आणि कार्यशाळांचे आयोजन करणे तसेच अध्यासन केंद्राच्या वतीने श्री सिद्धेश्वर देवस्थान समिती आणि महाराष्ट्र व कर्नाटकातील विविध संस्था व महाविद्यालयासोबत सामंजस्य करार करण्याचाही निर्णय घेण्यात आल्याचे डॉ. महानवर यांनी सांगितले.

या बैठकीस विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, मानवविज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे, महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्यासह सदस्य प्राचार्य गजानन धरणे, महादेव म्हावकर, स्वाती महाळंक, सुरेश शहापूरकर, सहुल पावले उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
महात्मा बसवेश्वर अध्यासन

लोकसत्ता दि:- 07/07/2025.

संचालक
महात्मा बसवेश्वर अध्यासन
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त उपक्रम

प्रतिनिधी | सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात थोर समता नायक, क्रांतिकारक महात्मा बसवेश्वर यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. खुली निबंध स्पर्धा व वचन अनुवाद स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्य हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना



विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती विविध उपक्रम घेण्यात आले.

विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे आदींचे प्रमुख उपस्थिती होती. महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या कार्याचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना डॉ. जिरवणकर म्हणाल्या की, सोलापूर विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या वचनावर विपुल संशोधन करण्यात यावे, त्यातून मोठ्या प्रमाणात ग्रंथ निर्माण व्हावे. त्यांच्या वचनांचा युवा पिढीने अभ्यास करून आदर्श समाज घडविण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. दामा यांनी सोलापूर परिसरातील कन्नड भाषिकांनी आणि मराठी भाषिकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या वचनातून मानवतावादी व लोकशाही रचना बळकट होण्यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

मंगळवार दि:- १४/०५/२०२४

दिव्यमराठी.

# महात्मा बसवेश्वरांच्या वचनांची पाठांतर स्पर्धा

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात कार्यक्रम

**सोलापूर, ता. १४ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंतीनिमित्त स्पर्धा व व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, व्याख्यात्या व ज्येष्ठ लेखिका डॉ अपर्णा जिरवणकर, महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांची उपस्थिती होती.



**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात प्रतिमापूजन प्रसंगी मान्यवर.

यावेळी बोलताना डॉ. मनिषा जिरवणकर यांनी सांगितले की, बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे महान कार्य करून जगाला समता व बंधुत्वाची शिकवण दिली. त्याकाळी त्यांनी जाती निर्मूलनाचे कार्य करून एक आदर्श या जगासमोर ठेवला. त्यांचे कार्य आजही आदर्श व प्रेरणादायी आहे. सोलापूर विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या वचनावर विपुल संशोधन होऊन त्यातून मोठ्या प्रमाणात ग्रंथ निर्माण व्हावे. त्यांच्या वचनांचा युवा पिढीने अभ्यास करून आदर्श समाज घडविण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावेत. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा व वचन अनुवाद स्पर्धा झाली. या प्रसंगी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रा. गजानन धरणे, डॉ. घुली, राहुल पावले, शहापूरकर, न्हावकर, प्रा. देवानंद चीलवंत, चन्नविर बंकुर आदी उपस्थित होते.

बुधवार दि:- १५/०५/२०२४

सकाळ.

# बसवण्णांनी जगाला समतेचा संदेश दिला

## डॉ. अपर्णा जिरवणकर; सोलापूर विद्यापीठात व्याख्यान

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे महान कार्य करुन जगाला समता व बंधुत्वाची शिकवण दिली. त्याकाळी त्यांनी जाती निर्मूलनाचे कार्य करुन एक आदर्श या जगासमोर ठेवले असे मत ज्येष्ठ लेखिका डॉ. अपर्णा जिरवणकर यांनी व्यक्त केल्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात थोर समतानायक, महात्मा बसवेश्वर यांची जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होत्या. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले.

व्यासपीठावर महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. कोळेकर यांनी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. जिरवणकर म्हणाल्या की, अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. दामा यांनी सोलापूर परिसरातील कन्नड भाषिकांनी आणि मराठी भाषिकांनी म. बसवेश्वर यांच्या वचनातून मानवतावादी व लोकशाही रचना बळकट होण्यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. याप्रसंगी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रा. गजानन धरणे, डॉ. घुली, राहुल पावले, शहापूरकर, न्हावकर, प्रा. देवानंद चिलवंत, चन्नवीर बंकुर आदी उपस्थित होते.



**सोलापूर : विद्यापीठात ज्येष्ठ लेखिका डॉ. अपर्णा जिरवणकर यांचे व्याख्यान घेऊन बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी बसवेश्वर अध्यासन केंद्राचे प्रमुख प्रभाकर कोळेकर, लक्ष्मीकांत दामा, डॉ. राजेंद्र वडजे आदी.**

बुधवार (दि:- १५/०५/२०२४) पुढारी.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
महात्मा बसवेश्वर अध्यासन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
महात्मा बसवेश्वर अध्यासन

# सोलापूर विद्यापीठात म. बसवेश्वरांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

✔ सोलापूर/प्रतिनिधी



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. खुली निबंध स्पर्धा व वचन अनुवाद स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद भेटला.

जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ लेखिका डॉ. अपर्णा जिरवणकर यांचे व्याख्यान पार पडले. महात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्य हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी व्यासपीठावर महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे आदींचे प्रमुख उपस्थिती होती. डॉ प्रसंगी डॉ कोळेकर यांनी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या कार्याचा आढावा घेतला.

डॉ. जिरवणकर म्हणाल्या की, बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे महान कार्य करून जगाला समता व बंधुत्वाची शिकवण दिली. त्याकाळी त्यांनी जाती निर्मूलनाचे कार्य करून एक आदर्श या जगासमोर ठेवला. त्यांचे कार्य आजही आदर्श व प्रेरणादायी आहे. त्यांच्या वचनाचा युवा पिढीने अभ्यास करून आदर्श समाज घडविण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावेत.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. दामा यांनी सोलापूर परिसरातील कन्नड भाषिकांनी आणि मराठी भाषिकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या वचनातून मानवतावादी व लोकशाही रचना बळकट होण्यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. या प्रसंगी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रा. गजानन धरणे, डॉ. पुली, राहुल पावले, शहापूरकर, न्हावकर, प्रा. देवानंद चीलवंत, चन्नविर बंकुरे आदी उपस्थित होते.

सुराज्य (दि:- १३।०५।२०२४)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★
महात्मा बसवेश्वर अध्यासन

# 'महात्मा बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली'



सोलापूर / प्रतिनिधी

महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात स्त्री-पुरुष समानतेचे धोरण अंगीकारत जातिवाद नष्ट करत समताधिष्ठित समाजाची निर्मिती करून समाज सुधारण्याचे महान व क्रांतिकारी कार्य केल्याचे गौरवोद्गार कपिलधारा येथील डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महास्वामी यांनी काढले.


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनच्यावतीने महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. प्रारंभी प्रास्ताविकामधून अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी अध्यासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी वचन साहित्याच्या माध्यमातून ज्ञानाचा भांडार निर्माण केला आहे. या वचनांमधून आदर्श जीवनशैली, विचारशैली तसेच चांगली शिकवण सांगितली. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटपाची निर्मिती करून लोकशाहीची र मूल्ये रुजवण्यास सुरुवात केल्याचेही त्यांनी यावेळी सांगित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंबादास भासके यांनी केले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
महात्मा बसवेश्वर अध्यासन

पुण्यनगरी दि: 30/04/2024

# विद्यापीठ : महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्या वतीने डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामींचे व्याख्यान



सोलापूर । बसवेश्वर हे केवळ विचार सांगणारे संत नव्हते तर प्रत्येक विचार हा कृतीत आणणारे क्रियाशिल संत होते. कोणताही जाती भेदभाव न करता जगातील पहिली लोकशाही संसद भरवणारे प्रणेते बसवेश्वर आहेत. असे प्रतिपादन डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनाच्या वतीने बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते. प्र. कुलगुरु प्रा. डॉ. दामा म्हणाले,'महात्मा बसवेश्वरांनी समाजाला दिशा देण्यासाठी नविन विचारांची मांडणी केली. बसवेश्वरांचे तत्कालीन विचार समाज परिवर्तनासाठी आजही मार्गदर्शक असल्याचे स्पष्ट केले.' प्रास्ताविक महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे समन्वयक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ महात्मा बसवेश्वर अध्यासन

दिव्यमराठी
दि:- 30/08/2024

# महात्मा बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली : डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य

### सोलापूर विद्यापीठात बसवेश्वर जयंतीनिमित्त व्याख्यान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात स्त्री-पुरुष समानतेचे धोरण अंगीकारत जातिवाद नष्ट करत समताधिष्ठित समाजाची निर्मिती करून समाज सुधारण्याचे महान व क्रांतिकारी कार्य केल्याचे गौरवोद्गार कपिलधारा येथील डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महास्वामी यांनी काढले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनच्यावतीने महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी डॉ. वीरूपाक्ष शिवाचार्य महास्वामी हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले.

डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी वचन साहित्याच्या माध्यमातून ज्ञानाचा भांडार निर्माण केला आहे. या वचनांमधून आदर्श जीवनशैली, विचारशैली तसेच चांगले शिकवण सांगितले आहे. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटपाची निर्मिती करून लोकशाहीची खरी मूल्ये रुजवण्यास सुरुवात केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा म्हणाले, महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे महान कार्य केले आहे. अनेक वचन साहित्य त्यांनी रचले. सूत्रसंचालन डॉ. अंबादास भासके यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
महात्मा बसवेश्वर अध्यासन

तरुण भारत
दि: 30/04/2024

# महात्मा बसवेश्वरांच्या वचनांद्वारे समाज परिवर्तन शक्य

## डॉ. विरूपाक्ष महास्वामी; विद्यापीठात जयंतीनिमित्त व्याख्यान

सोलापूर, ता. २८ : प्रत्येक विचार कृतीत आणणारे क्रियाशील संत म्हणजे महात्मा बसवेश्वर होते. समताधिष्ठित समाजाची निर्मिती करून समाज सुधारण्याचे महान व क्रांतिकारी कार्य त्यांनी केले. त्यांच्या वचनांद्वारे सध्या समाजात सकारात्मक परिवर्तन शक्य आहे, असे प्रतिपादन डॉ. विरूपाक्ष महास्वामी यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासनातर्फे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



**सोलापूर :** व्याख्यानाच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित डॉ. विरूपाक्ष महास्वामी, डॉ. लक्ष्मीकांत दामा, डॉ. प्रभाकर कोळेकर, प्रा. गजानन धरणे, महादेव न्हावकर व इतर.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते. धर्म म्हणजे सर्वांना समान दर्जा होय. बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानता, जातीभेद निर्मुलन, आंतरजातीय विवाह, पर्यावरण संरक्षण अशा विविध विषयावर प्रत्यक्षात काम केले आहे. त्यांना समतानायक, कृतिशील समाजसुधारक म्हटले जाते, असेही डॉ. विरुपाक्ष महास्वामी यांनी नमुद केले. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी महात्मा बसवेश्वरांनी समाजाला दिशा देण्यासाठी केलेली विचारांची मांडणी आजही मार्गदर्शक असल्याचे स्पष्ट केले. सुहास पुरवणे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित विशेष पुरवणीचे प्रकाशन करण्यात आले.

सूत्रसंचालन व आभार डॉ. अंबादास भासके यांनी केले. यावेळी डॉ. देवानंद चिलवंत, डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. अनिल घनवट, डॉ. अभिजित जगताप, डॉ. अंजना लावंड, ॲड. जावेद खैरादी, डॉ. विकास कद्दू आदींसह विविध संकुलाचे संचालक, प्राध्यापक, विद्यापीठातील कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक सकाळ :- (30/08/2024)